# ॥ श्रीगुरुचरित्र आशय ॥

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

## *व्यक्तिमत्वानुरुप व्यवसाय मार्गदर्शक – धौम्यमुनि*

द्वापारयुगाच्या अंती धौम्यमुनी व त्यांचे तीन शिष्य ह्यांच्या पुराणकथा श्रीगुरुचरित्रकार अध्याय १६ मध्ये सांगतात. सुमारे ५००० वर्षांपूर्वी तळपायास बाण लागण्याचे निमित्त होऊन, भगवान श्रीकृष्ण अवतार समाप्त झाल्यावर, द्वापारयुग युग संपले व कलियुग सुरु झाले, असा संदर्भ पुराणांमध्ये आढळतो.

श्रीगुरुचरित्रकारांनी ५०००वर्षांपूर्वीची गुरुकुलातील परिक्षा पद्धती अध्याय १६मध्ये चित्रित केलेली आहे. धौम्यमुनि ह्या गुरुने आपल्या तीनही शिष्यांचे परिक्षण व्यक्तिमत्वानुरुप केलेले दिसते.

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

श्रीगुरु श्रीनृसिंहसरस्वती परळी वैजनाथ येथे भूमीगत स्थितीत वास्तव्यास होते. ह्या ठिकाणी स्वतःच्या गुरुंवर नाराज असलेला निराश ब्राह्मण श्रीगुरुंना ओळखतो. तो आपल्या मनातील स्वतःच्या गुरुविषयीच्या तक्रारी श्रीनृसिंहसरस्वती यांना सांगतो. श्रीनृसिंहसरस्वती ह्या मध्यमवयीन ४८ वर्षीय (ओवी क्रमांक १४७- अध्याय १६) ब्राह्मणास धौम्यमुनी व त्यांच्या तीन शिष्यांच्या गोष्टी सांगतात.

सिद्धमुनींनी ह्या तीनही गोष्टी तसेच श्रीगुरुंच्या सानिध्यातील आठवत असलेले मनोहर स्नान ह्यांचे सविस्तर वर्णन नामधारक शिष्यास अध्याय १६मध्ये सांगितलेले आहे. परळी - वैजनाथ येथे केलेल्या स्नानाच्या

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

आठवणीत रमणारे सिद्धमुनी, श्रीगुरुंच्या सहवासात बालपणी राहिलेले असावेत.

श्रीगुरुंनी सांगितलेल्या पुराणकथेमध्ये धौम्यमुनिंच्या ३ शिष्यांच्या गोष्टी वर्णन केलेल्या आहेत. ह्या तीन शिष्यांना वेदशास्त्र, व्याकरण ह्यांचे ज्ञान शिकवून ध्यौम्यमुनिंनी प्रत्येकाची परिक्षा वेगवेगळ्या प्रकारे घेतलेली दिसते.

१) शिष्य आरुणी हा पांचाळ म्हणजे मूर्ख, बडबड्या होता.

खूपदा काही लहान मुले नित्य नवीन कल्पना मांडत असतात. त्यांच्यातील नाविन्याचा ध्यास लक्षात न घेता, मोठी माणसे त्यांना “मूर्खासारखी बडबड करु नकोस”, असे म्हणून गप्प बसवितात.

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

शिष्य आरुणीला धौम्यमुनी स्वतःची भातशेती पाण्याने भरण्यास पाठवितात.

भात शेतीत पाणी साठवावे लागते. ह्या शेतात जमीन नुसती पाण्याने भिजवून चालत नाही. तिथे पाण्याची रेलचेल असेल, तरच भाताचे शेत संपूर्ण पाण्याने भरु शकते.

भातशेती जवळून धबधब्याकडे जोरात वहाणाऱ्या कालव्याचे पाणी अडवून भातशेतीला पुरविणे, हे आव्हान कल्पक आरुणी लिलया पेलतो. पाण्याच्या फोर्सने मोठमोठे दगड धोंडे वाहून जातात, तर मनुष्य वाहून जायला कितीसा वेळ लागणार ?

आरुणीने कालव्याच्या एका कडेवर असलेल्या दरडी हाताने मजबूत धरल्या. आपले दोन्ही पाय

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

कालव्याच्या दुसऱ्या बाजूवर पसरले. ह्याचा अर्थ आरुणीचे डोके दरड असलेल्या कालव्याच्या उंच कडेवर, पाण्याबाहेर होते. खांद्यापासून कमरेपर्यंतचे आरुणीचे शरीर पाण्यात होते. दरड धरलेले हात व दुसऱ्या बाजूवर पसरलेले पाय यांच्या सहाय्याने आरुणी जोरात वहात असलेल्या पाण्यात शरीराचा मजबूत बांध घालू शकला असावा. (ओवी क्रमांक ५७ )

शिष्य आरुणीने स्वतःच्या शरीराचा बांध घालून, कालव्याचे पाणी अडवून श्रीगुरुंचे भात शेत पाण्याने पूर्ण भरले, अशा ह्या कल्पक शिष्याला श्रीगुरुचरित्रकार स्तौम मौळी म्हणून गौरवितात.

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

अशा ह्या कल्पक शिष्यास धौम्यमुनी सांगतात, तुला वेदशास्त्र व्याकरण विद्या आलेली आहे म्हणजे तू शास्त्रज्ञ झालेला आहेस. आता तू विवाह करुन गृहस्थाश्रम स्वीकार.

शास्त्रांमध्ये पारंगत झाल्यावर, कल्पक व्यक्ती नित्य नवीन संशोधनाचा ध्यास घेऊ शकते. आयुष्यात शास्त्रज्ञ म्हणून यशस्वी होऊ शकते.

२)धौम्यमुनींचा दुसरा शिष्य 'बैद' हा केवळ म्हणजे स्वतंत्र विचारसरणीचा असतो.

शिष्य बैदला धौम्यमुनि भातशेतीची रात्रंदिवस राखण करायला सांगतात. बैदच्या एकट्याने

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

केलेल्या राखणदारीत तयार झालेले भाताचे पीक आणण्यासाठी, गाडी व एक रेडा धौम्यमुनी देतात.

कोणतेही काम करताना नुसती स्वतंत्र विचारसरणी कामाची नसते, रेड्याच्या वेगाशी शिष्य बैदला जमवून घ्यावे लागते. थोडक्यात 'एकामेका साह्य करु अवघे धरू सुपंथ'

भात पिकाने अंदाजे ७३६ किलोग्रॅम वजन भरलेली गाडी चिखलात रुतल्यावर शिष्य बैद रेड्याला गाडीच्या जूमधून मुक्त करतो व स्वतः प्राणपणाने गाडी चिखलाबाहेर काढण्याचा प्रयत्न करतो.

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

धौम्यमुनि शिष्य बैदवर प्रसन्न होतात. त्याला ते भावी आयुष्यात शास्त्री होऊन, गृहस्थाश्रम स्वीकारण्यास सांगतात.

स्वतंत्र विचारांची व्यक्ती शास्त्र अधिकारवाणीने लोकांना सांगू शकते. अशा व्यक्तीने आपल्या ज्ञानाचा उपयोग समाजातील अज्ञानी लोकांना, रेड्यासारखेच अडचणीतून बाहेर काढण्यासाठी करायचा असतो.

३) शिष्य उपमन्यु हा बाळपण न संपलेला खाण्यात रमणारा, चंचल स्वभावाचा परंतु प्रामाणिकपणे गुरु आज्ञा पालन करणारा असतो. धौम्यमुनी उपमन्युची जाडी कमी व्हावी म्हणून त्याला घरी कमी जेवण देऊन मिळणारी भिक्षा घरी देण्यास सांगतात.

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

घरी जेवणाची तृप्ती होत नाही म्हणून भिक्षेवर आपली भूक भागविणारा उपमन्युला दोन्ही भिक्षा घरी देण्यास सांगतात. उपमन्यु प्रामाणिकपणे दोन्ही भिक्षा घरी देतो. वासराच्या स्तनपानातून गळणाऱ्या दुधावर शिष्य उपमन्यु आपली भूक शमवितो. उपमन्युची जाडी आहार संतुलनाद्वारे (Diet द्वारे) कमी करण्याचा धौम्यमुनिंचा प्रयोग फसतो.

“उष्टे दूध पिण्याने बुद्धी कमी होते”, असा सल्ला देऊन उपमन्युला धौम्यमुनी दूध पिण्यापासून रोखतात. आज्ञाधारक उपमन्यु स्वतःची भूक शमविण्यासाठी रुईच्या झाडाचा चीक खाण्याचा प्रयत्न करतो. त्याचे बालिश मन त्याला सांगते, ‘झाडाचा चीक असल्याने तो उष्टा नाही’. हा

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

चीक झाडाच्या पानात भरुन पीत असताना उपमन्युच्या डोळ्यात उडतो. उपमन्यु आंधळा होतो, तरीही तो आपल्या गुरुंची गुरे शोधण्यास निघतो. त्याच्याहातात काठी नसल्याने विहिरीचा अंदाज येत नाही. उपमन्यु विहिरीत पडतो.

धौम्यमुनि उपमन्युला शोधण्यास निघतात.

विहिरीत पडलेल्या उपमन्युला अश्विनीकुमाराचे स्मरण करावयास धौम्यमुनी सांगतात व उपमन्युला दृष्टी येते. ह्याचा अर्थ "अश्विनीकुमार देवांचा वैद्य असल्याने, त्याच्या वैद्यक शास्त्रातील शिकविलेले उपाय आठव व त्या उपायांचा आपल्या स्वतःच्या डोळ्यांवर उपयोग कर," असे धौम्यमुनी सांगत असावेत. कारण इथे नामस्मरण कर न म्हणता

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

“धौम्यमुनि स्मरण कर म्हणजे धन्वंतरीचे वैद्यकीय ज्ञान आठव,” असे म्हणत असावेत.

खाण्याच्या हावरटपणातून डोळे गमविण्यापर्यंत वेळ येऊ शकते, हे धौम्यमुनि शिष्य उपमन्युला दाखवून देतात. भावी संकटाची झलक दिसल्याशिवाय आहार नियंत्रण(Diet) कर, वगैरे गोष्टींकडे खादाड माणूस दुर्लक्ष करतो.

उपमन्युचा आज्ञाधारक स्वभाव, धौम्यमुनिंनी दिलेले ज्ञान, प्रामाणिकपणे आपल्या शिष्य वर्गाकडे पोचविण्यास योग्य आहे. त्यामुळे तो आदर्श गुरु म्हणून भावी जीवनांत यशस्वी होऊ शकतो म्हणून धौम्यमुनि शिष्य उपमन्युला विवाह करुन गृहस्थाश्रम स्वीकार.

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

तसेच "तुझा उत्तंक नामक शिष्य तुझ्यातील गुरुचे भूषण असेल," असा आशीर्वाद देतात.

पुराणकथेनुसार उपमन्युचा 'उत्तंक' हा शिष्य गुरुभक्त होता. उत्तंक ऋषीची कुंडले तक्षकाने हरण केली. तक्षक हा कश्यप ऋषीस कद्रूपासून झालेला सर्प पूत्र होता. अभिमन्यु पूत्र असलेल्या राजा परिक्षिताला, तक्षक ह्या सापाच्या दंशाने मृत्यु आला. राजा परिक्षिताचा मुलगा असलेल्या जन्मेजय राजाने, उत्तंक ऋषींच्या उत्तेजनावरुन सर्प सत्र केले. त्यात निरनिराळ्या जातीचे हजारो साप दग्ध झाले. नंतर आस्तीक ऋषीने येऊन ते सर्प सत्र बंद करविले. सृष्टीतील सर्पकुलाचा नाश आस्तीक ऋषींनी थांबविला.

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

जीवनातील यशस्वी शिष्य उत्तंकचा गुरु उपमन्युला निश्चित अभिमान वाटला असणार.

ह्या तीनही कथा ऐकून तो ब्राह्मण पश्चाताप दग्ध होतो. श्रीगुरुंना शरण येतो. पश्चातापाने स्वच्छ झालेल्या ह्या मध्यमवयीन ब्राह्मणास, श्रीगुरु त्याच्या गुरुकडे परत पाठवितात.

प्रत्येक गोष्टीच्या शेवटी श्रीगुरुचरित्रकार सांगतात, "शिष्य परिक्षा उत्तीर्ण होतो. धौम्यमुनि शिष्याच्या डोक्यावर हात ठेवतात. शिष्याला सर्व ज्ञान येते." ह्याचा अर्थ 'आत्तापर्यंत गुरुगृही मिळविलेले ज्ञान आता तो शिष्य आपल्या उपजिविकेसाठी वापरु शकतो,' हा आशीर्वाद धौम्यमुनि देतात.

## अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

| |
|---|
| हल्लीच्या युगात परिक्षा पास होऊन पदवी मिळाल्यावर, समाजमान्यता मिळून उपजिविकेचे साधन म्हणून पदवीधारकास, त्या पदवीचा उपयोग करता येतो. |
| प्राचीन काळी गुरुच्या परिक्षित (परीक्षेत किंवा कसोटीस उतरलेल्या) शिष्यास समाज मान्यता मिळून, उपजिविकेचे साधन म्हणून मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करता असे. |

२०व्या शतकातील शिक्षणक्षेत्राला गुरुजी, सर, बाई यांच्या रुपांत धौम्यमुनिंचे वारसदार शिक्षक लाभले. विद्यार्थी दशेतील सुखाच्या डोक्यावर, सतत परिक्षेची टांगती तलवार होती. वेळप्रसंगी शिक्षकवृंदाकडून छडीचा प्रसादही मिळत असे.

## ॥ श्रीगुरुचरित्र आशय ॥

### अध्याय सोळावा गुरुशुश्रूषणमाहात्म्यवर्णन

तळमळीने भावी जीवनाची शिदोरी देणाऱ्या ह्या शिक्षकांचे ऋण मानताना, २१व्या शतकातील शिक्षणक्षेत्राला सांगावेसे वाटते,

‘ छडी लागे छम छम, विद्या येई घमघम ’

॥ जय श्रीगुरुदेव दत्त ॥